# पुणे विद्यापीठ

## प्रकटन

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम २७(१)(एन) आणि पुणे विद्यापीठ परिनियम ११३ नुसार विद्याशाखेच्या प्रत्येक समुहांमधून एक याप्रमाणे विद्याशाखेच्या समुहाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खालील विद्याशाखेतील एक व्यक्तीची विद्यापरिषद सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेवरील निवडणूक.

१) **कला, ललित कला व प्रयोगजिवी कला विद्याशाखा.**
२) **विज्ञान विद्याशाखा**

निवडणूक सूचना क्र. पुविनि/२८४ दिनांक १३ मे, २०११ नुसार वर उल्लेख केलेल्या निवडणूकीसाठी आलेल्या उमेदवारी अर्जाची छाननी विद्यापीठ कार्यालयात सोमवार, दिनांक २३ मे, २०११ रोजी करण्यात आली. उमेदवारी अर्जांच्या छाननीनंतर ज्यांचे उमेदवारी अर्ज ग्राह्य ठरले आहेत, अशा उमेदवारांची उमेदवारी मागे घेण्याच्या अंतिम तारखेनंतरची नांवे व पत्ते खालीलप्रमाणे आहेत.

## कला, ललित कला व प्रयोगजिवी कला विद्याशाखा.

१) डॉ. देवरे रमेश कृष्णा
एम.व्ही.पी.एस.चे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
नांदगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक.

२) प्रा. तावरे स्नेहल लालसिंह
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे
मॉडर्न महाविद्यालय,
शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५.

## विज्ञान विद्याशाखा

१) प्राचार्य चासकर मनोहर गणपत
पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे
बाबुरावजी घोलप महाविद्यालय,
सांगवी, पुणे - ४११ ०२७

२) प्राचार्य (डॉ.) गायकवाड विश्वास भास्करराव
के.टी.एच.एम.महाविद्यालय,
शिवाजीनगर, गंगापूर रोड,
जि. नाशिक - ४२२ ००२

१) उमेदवारांची संख्या निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त असल्यामुळे उपरोक्त विद्याशाखेतील प्रत्येकी एका व्यक्तीची विद्यापरिषद सदस्यांमधून व्यवस्थापन परिषदेवरील निवडणूक **शुक्रवार, दिनांक ३ जून, २०११** रोजी घेण्यात येईल.

२) सदर निवडणूक, संत नामदेव सभागृह, पुणे विद्यापीठ, पुणे - ४११००७ येथे घेण्यात येईल.

३) ही निवडणूक प्रमाणशीर प्रतिनिधीत्व पध्दतीनुसार एकक संक्रमणीय मतानुसार परिनियमांव्दारे विहित केल्याप्रमाणे घेण्यात येईल.

४) मतदाराने मतदानास येताना स्वतःचा फोटो असलेले ओळखपत्र, उदा. वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसेन्स), किंवा ते जेथे सेवेत आहेत तेथील नियोक्त्याने दिलेले ओळखपत्र किंवा आयकर कार्यालयाने दिलेले पॅन कार्ड किंवा फोटो असलेले तत्सम ओळखपत्र आणणे आवश्यक आहे.

3 faculty members in Academic council on Management

५) निवडणूक अधिका-यांना ओळखपत्र दाखविल्याशिवाय मतपत्रिका मिळणार नाही.

६) मतदान कक्षात मोबाईल, व्हिडिओ कॅमेरा वापरण्यास बंदी आहे.

७) निवडणूक सूचनेतील वेळापत्रकात नमूद केलेल्या वेळेनंतर येणा-या मतदारांना मतपत्रिका देण्यात येणार नाही.

८) शुक्रवार, दिनांक ३ जून, २०११ रोजी निवडणूकीनंतर लगेचच संत नामदेव सभागृह, पुणे विद्यापीठ, पुणे- ४११ ००७ येथे मतमोजणी होऊन निवडणूकीचा निकाल जाहीर होईल, त्यावेळी उमेदवार स्वतः किंवा उमेदवाराने लेखी अधिकार पत्र दिलेला त्याच मतदार यादीतील मतदार असलेला त्याचा प्रतिनिधी पूर्व सूचना देऊन ओळखपत्र दाखवून हजर राहू शकेल.

गणेशखिंड, पुणे ४११००७ )
संदर्भ क्र. पुविनि/२७(१)(एन)/२८५ )
दिनांक :२७मे, २०११ )

**मा. कुलगुरू यांच्या आदेशावरुन**

**( डॉ. मा. ल. जाधव )**
**कुलसचिव**

**प्रत : संबंधित मतदार.**

3 faculty members in Academic council on Management